प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001 फोन/Phone: 022- 22660502

आज़ादी का अमृत महोत्सव

ऑक्टोबर 23, 2023

## भारतीय रिझर्व्ह बँकेने इंद्रायणी को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, पिंपरी, महाराष्ट्र वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिझर्व्ह बँकेने 25 सप्टेंबर 2023 रोजीच्या आदेशाद्वारे इंद्रायणी को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, पिंपरी, महाराष्ट्र (बँक) वर रिजर्व बँकेच्या 'उत्पन्नाची ओळख, मालमत्तेचे वर्गीकरण, तरतूद आणि इतर संबंधित बाबी – UCBs' आणि 'भारतीय रिजर्व बँक तुमचा ग्राहक जाणा (KYC) निर्देश 2016', यासंदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या निर्देशांचे पालन न केल्यामुळे ₹3 लाख (केवळ तीन लाख रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 कलम 46(4)(i) आणि 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(c) अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे बँकेने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही.

### पार्श्वभूमी

31 मार्च 2022 रोजीच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भात आरबीआयने बँकेची केलेली वैधानिक तपासणी, तपासणी अहवाल, जोखीम मूल्यांकन अहवाल आणि त्याच्याशी संबंधित सर्व संबंधित पत्रव्यवहाराची तपासणी, यावरून असे निदर्शनास आले की बँकेने (i) उत्पन्न ओळख, मालमत्तेचे वर्गीकरण आणि तरतूदीशी संबंधित विवेकपूर्ण नियमांचे पालन केले नाही, आणि (ii) आपल्या ग्राहकांच्या KYC च्या नियतकालिक अद्यतनासाठी प्रणाली लागू केली नाही. त्यानुसार, बँकेला नोटीस बजावण्यात आली होती ज्यात बँकेला त्यात नमूद केल्याप्रमाणे, निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल बँकेला दंड का लागू करू नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती.

नोटिशीला बँकेचे उत्तर आणि वैयक्तिक सुनावणी दरम्यान केलेले तोंडी सादरीकरण यांचा विचार केल्यानंतर, भारतीय रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की वरील प्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांचे पालन न केल्याचा आरोप सिद्ध झाला आहे आणि अशा निर्देशांचे पालन न करण्याच्या मर्यादेपर्यंत आर्थिक दंड आकारला जाणे आवश्यक आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबन्धक

**प्रेस प्रकाशनी: 2023-2024/1167**